REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरीतील स्त्री जाणिवा




**डॉ. विजय अर्जुन रेवजे**
**लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय सोलापूर.**

## प्रस्तावना:

स्त्रीने स्वतःला ओळखण्यातच स्त्रीवादाचा प्रारंभ झाला. स्वतःचे आस्तित्व हरवून गेलेल्या स्त्रीला प्रस्थापितांकडून आणि पितृसत्ताक व्यवस्थेकडून आपण मुख्य प्रकटाबाहेर फेकले गेल्याची जाणीव झाली. स्त्री म्हणून आपले अस्तित्त्व टिकवून ठेवण्याचा विचार मनात येऊन स्वसामर्थ्यानिशी तिने वागायला सुरूवात केली. तेथूनच स्त्रीवादाची सुरूवात झाली. म. फुले, आगरकर, पं. रमाबाई, महर्षी कर्वे यासारख्या विचारवंतांनी स्त्री सुधारणा मोहिमेला हातभार लावला. ताराबाई शिंदे, म. गांधी, डॉ. आंबेडकर या समाजसुधारकांनी प्रत्यक्ष कृती व संघर्ष करीत विचारांची मांडणी केली. ही मांडणी स्त्रियांच्या समानतेला वैचारिक अधिष्ठान देणारी ठरली. तरीदेखील एकविसाव्या शतकात स्त्री-पुरूष समानतेमध्ये विषमता आढळते. सुशिक्षित स्त्रियादेखील ग्रामीण भागात आजही उपेक्षित गणल्या जातात. स्त्रियांच्या हक्कांसाठी, तिला समान लेखण्यासाठी, तिच्याकडे पाहण्याच्या पारंपरिक दृष्टिकोनात बदल करण्यासाठी अनेक लेखक लिहू लागले. मराठी ग्रामीण स्त्री विषमतेचे चित्रण कथा, कादंबरी, काव्य, नाटक या साहित्यप्रकारातून होऊ लागले. विशेषतः राजन गवस यांनी स्त्री जाणिवांचे नवे पदर कादंबरी लेखनातून अधोरेखित केले आहेत.

प्रस्तुत निबंधात राजन गवस यांच्या 'कळप', 'तणकट' व 'ब-बळीचा' या कादंबऱ्यामधिल स्त्री जाणिवांच्या आविष्कार स्पष्ट करणार आहे.

राजन गवस यांनी 'चौंडक' (१९८५), 'भंडारभोग' (१९८९), 'धिंगाणा' (१९९२), 'कळप' (१९९७), 'तणकट' (१९९८), 'ब-बळीचा' (२०१२) इत्यादी कादंबरीचे लेखन केले आहे. या कादंबऱ्यामधून स्त्री जाणिवेचे विविध पदर स्त्री व्यक्तिरेखेच्या माध्यमातून उलघडून दाखविले आहेत. समकालीन जीवनवास्तव आणि कला यात अनुबंध असतो. लेखकाची जीवनदृष्टी 'कादंबरी' या वाङ्मयप्रकारात महत्त्वाची असते. तो अनुबंध, ती दृष्टी राजन गवस यांच्या 'कळप', 'तणकट' व 'ब-बळीचा' या कादंबऱ्यामध्ये आहे. स्त्रियाच्या उपेक्षित जीवनाचा शोध व स्त्री जाणिवांचा आविष्कार त्यांच्या या कादंबऱ्यामधून चित्रित होत आहे.

## देवदासी स्त्रियांच्या दुःख जाणिवा

'कळप' (१९९७) या कादंबरीमध्ये दांभिक लोकांचे कळप करून राहणे हे सामाजिक, सांस्कृतिक मूल्यहऱ्हासास कसे कारणीभूत आहे? साहित्यविषयक चळवळ व त्यांची कंपूशाही इत्यादी विषयीचे प्रभावी चित्रण आले आहे. रघू चिलमी या कादंबरीनायकाच्या अनुषंगाने देवदासी स्त्रियांच्या जाणिवा आविष्कृत झाल्या आहेत. देवदासी स्त्रियांना शिक्षणव्यवस्थेला मुकावे लागते. वास्तविक शिक्षण ही व्यक्तीच्या आंतरिक आणि बाह्य व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी उपयुक्त ठरणारी बाब आहे. स्त्रीशिक्षणातून स्त्रीमुक्ती होऊ शकते. परंतु धर्माच्या नावाखाली स्त्रियांचे शोषण केले जाते. अजाण मुलींना बालपणीच देवीला अर्पण केल्याने शिक्षणापासून वंचित व्हावे लागत आहे. अजाणत्या वयात देवत्वाचे ओझे निमूटपणे स्वीकारून आईबापाच्या छात्राखालून दूर व्हावे लागत आहे कळत्यापणी भोगवटा सुरू होतो.

त्यावेळी घरातल्या माणसांना शिव्याशाप देत जोगतिणी आपले उर्वरित आयुष्य कंठतात. आपल्या जीवनातील दुःख, वैताग व्यक्त करताना एका प्रसंगीगोजाबाई ही जोगतीण आपल्या मनातला उद्वेग व्यक्त करताना म्हणते, "मी सत्यापाची लेक, आजी जोगतीण व्हती म्हणून गादी चालवाया मला सोडली. रांडाभाड्यांनी आपलं चांगलं करायचा मला हेच्यात ढकलली. त्येंच्या तोंडात माती पडली. त्येंच्या कारण सतरा उंबरं फिरायची पाळी आली. उटवा झाला त्येंचा... . इस्तू लागला ह्या जलमाला... ह्यो कसला जलम ? रांडाभाड्यांनी माझा उदोस केला." (पृ. ४३) देवदासींना कुटुंबव्यवस्थेपासून उखडून टाकले आहे. कुटुंब आणि समाज ही पुरुषसत्तेची केंद्रे असल्यामुळे देवदासींना सामाजिक अवहेलना आणि छळ सहन करावा लागत आहे. त्यामुळे जोगतिणी गावच्या कुचेष्टेचा, हेटाळणीचा विषय होतात. 'कळप' कादंबरीमधील सत्तव्वा जोगतीण देवदासींच्या मेळाव्यात आपले दुःख मांडताना म्हणते, "लई घडलंय माझ्या जल्मात. न्हाण व्हतो तवा आजीनं पयला भंडारा कपाळाला लावला. पदर आला तवा देवीचं दर्शन गळ्यात आलं... हितल्याच पाटलाच्या पोराशी झुलवा लावला." (पृ. ७४) या कादंबरीचा नायक रघू चिलमी देखील स्त्रियांच्या जाणिवाबद्दल संवेदनशील आहे. मेळाव्याची बातमी वाचल्यानंतर त्याची प्रतिक्रिया स्त्री शोषण स्पष्ट करते. "माझ्या डोक्यातून मेळावा जात नव्हता, मेळावा झाला म्हणजे काय झाले. त्यांची भाषण, त्यांचे फोटो, बायका आल्या तशाच परत गेल्या की." (पृ. ७४) चळवळ देवदासींच्या व्यवस्थेपर्यंत पोहोचू दिली जात नाही. याविषयीची खंत रघूच्या विचारांतून विशद होत आहे. रघूचा मित्र शंकऱ्या सनमाडीकर सरांना म्हणतो, "काहीतरी चुकतयं सर तुमचं... तुमच्याकडे येणाऱ्या बायकास्नी पक्ष नकोत, त्यांना प्रश्न तेव्हढाच माहितीय, त्याचं काय?" (पृ. ११७) रघू व शंकऱ्या यांच्या विचारातून राजकीय पक्षदेखील स्त्रीशोषण करतात हे स्पष्ट होत आहे.

## आंतरिक मनाची घुसमट

'कळप' कादंबरीतील बायनावहिनी मनाला चटका लावणारी आहे. तिचा नवरा मुंबईत गिरणी कामगार आहे. तो तिकडेच राहतो. गावाकडे येत नाही. सासू, सासरा, भावजय यांच्याकडून वारंवार बायनाला सासरी मानसिक त्रास सहन करावा लागतो. शेवटी तिने मुंबईला नवऱ्याला लिहिलेल्या पत्रात तिच्या आंतरिक मनाची घुसमट स्पष्ट झाली आहे, "आता सगळ कळवून कळवून कटाळलोय, हे आकीरचं. ह्यावर काय विलाज न्हाई झाला तर माझं मढं बघायला गावल. जगाच्या वरही तुमचीच कसली म्हमई? बरोबरीचं लग्न झाल्याल्यांनी सरकारी दवाखान्यात आपरीसनं करून घेतली. मी अशी वांजच न्हावू काय? जगाच्या लाजंसाठी तरी गावाकडं चक्कर व्हवू दे." (पृ. ३७) शेवटी क्षयरोग झालेल्या नवऱ्यास बायना मुंबईहून घेऊन येते. पतसंस्थेचे कर्ज काढते. नवरा मरतो आणि बायनाचा जगण्याचा संघर्ष सुरू होतो. स्त्री जीवनाचे गहिरे दुःख विशद होते.

'तणकट' (१९९८) ही राजन गवस यांची साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कादंबरी आहे. गावातील जीवन व गावकुसाबाहेरील जीवन यांचा उभा आडवा छेद ही कादंबरी घेते. खोटी स्वप्ने दाखवणारे, लुटणारे पुढारी संपूर्ण गावची कशी शोकांतिका करतात याचे चित्र उभे राहते.

## पुरूषी मानसिकता व स्त्रियांची हतबलता

'तणकट' मधील बाळासाहेब शेडबाळेची बायको तारा हिची हतबलता दिसते. शेडबाळेचा बाहेरख्यालीपणा, ताराचा संसाराचा व्याप यामुळे ताराची झालेली सैरभैर अवस्था इत्यादीचे सूक्ष्म तपशिलासह आलेले वर्णन लेखकाच्या सूक्ष्म स्त्रीविषयक जाणिवा स्पष्ट करतात. "कधी काळी भक्कम हाडामासांची तारा आता तुरकाटी झाली होती. अंगावरच्या कपड्याचंही तिलाआता फारसं कौतुक उरलेलं नव्हतं. दिवसभरात ती जेवणपाणी आणि इकडं तिकडं करत घरातच कोंडून घ्यायला लागली होती. घरातून बाहेर पडायचं तिच्या जिवावर येत होतं. कुणाशी बोलावं, मन मोकळे करावं, पोट भरून रडावं ही तिची इच्छाही संपत गेली होती. चेहऱ्यावर एक प्रचंड उदासपण साचतगेलेलं होतं." (पृ. १२२) पुरूषी मानसिकतेच्या दबावाखाली स्त्रियांची होणारी कुंचबनां स्पष्ट झाली गेलेलं होताला घरातील ओढाताण, शेतातील काम यापेक्षा नवऱ्याच्या अनैतिक वर्तनाने ती जास्त खचली आहे. नवऱ्याचे रामा महाराची बायको-सुलीशी अनैतिक संबंधामुळे

गावात होत असलेल्या बेअब्रुच्या मानसिक दडपणाखाली जगणारी हतबल ताराचे दुःख राजन गवस यांनी नेमकेपणाने चित्रित केले आहे. यामधून स्त्री जाणिवांचा आविष्कार स्पष्ट झाला आहे.

'तणकट' या कादंबरीमध्ये जी स्त्रीपात्रे येतात ती ग्रामसंस्कृतीतील अर्थमूल्यांना व नीतिमूल्यांना आपापल्या प्रकृतीप्रमाणे प्रतिसाद देणारी आहेत. परंतु ती पुरूषी मानसिकतेमुळे हतबल झालेली दिसतात. कबीरची आई गंगव्वा, डेप्युटी गोपाळाची पत्नी, शेडबाळ्यांवर भुरळ घालणारी सुली, शेडबाळ्याची पत्नी तारा ही पात्रे खूप कष्ट करणारी आहेत. शेडबाळ्याच्या सहवासात येण्यापूर्वी सुलीही कष्ट करत होती. ही सर्व स्त्रीपात्रे कष्टाळू, सोशीक पण जीवनातील समस्यांवर मात करणारी आहेत. अंतःकरणात कणव आहे. परंतु पुरूषी मानसिकतेपुढे हतबल झाल्याचे दिसते.

'ब-बळीचा' ही राजन गवस यांची कादंबरी (२०१२) ग्रामजीवनातील नवे गुंतागुंतीचे प्रश्न मांडणारी आहे. खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण या संस्कृतीपुढे मानवी जगण्याचे भावबंध तुटत गेले. जगण्याची, जिवंत राहण्याची भावनाच पहिल्यांदा उध्वस्त झाली असे का झाले या चिंतनातून या व्यवस्थेचा शोध घेतला आहे 'ब-बळीचा' कादंबरीतील तायव्या ही स्त्री आशावादाचे दर्शन घडवते. अत्यंत कष्टाळू, समंजस, सोशिक अशी तायव्वा नवऱ्याप्रमाणेच आपल्या शेतावर प्रेम करणारी आहे. नवऱ्याच्या दोन्ही बहिणींच्या संकटकाळात वेळप्रसंगी कर्ज काढून मदत करताना ती नवऱ्याच्या बाजूने उभी राहते. नवरा तापाने फणफणतो तेव्हा त्याची काळजी घेते. मुलगा शहरात भावाजवळ राहून शिकावा असा आशावाद उराशी बाळगतो. वाट्याला निराशा येते. मुलगा शिकून मोठा अधिकारी होईल या आशेवर जगणारी तायव्या या कादंबरीत चित्रित होते. कृषीजनसमूहातील 'तायव्या' च्या रूपाने स्त्री जाणिवांचे सोशीकपणाचे पदर राजन गवस यांनी उलघडून दाखविले आहेत. समारोप

एकूणच राजन गवस यांच्या 'कळप' 'तणकट', 'ब-बळीचा' या कादंबऱ्यामधील चित्रित केलेल्या स्त्रीव्यक्तिरेखा संयमी, सोशीक व उपेक्षित स्वरूपाच्या आहेत. देवदासीच्या प्रश्नांतून स्त्रियांच्या दुःख जाणिवांचा हुंकार 'कळप' या कादंबरीमध्ये अधोरेखित केला आहे. 'तणकट' मधून पुरूषी मानसिकतेत स्त्रियांची होणारी कुंचबना, अवहेलना, त्यातून येणारी मानसिकता स्पष्ट केली आहे. 'ब- बळीचा' मधून स्त्रियांची सोशीकता चित्रित होते. एकूणच 'कळप', 'तणकट', 'ब-बळीचा' या कादंबऱ्यातून राजन गवस यांनी स्त्री जाणिवांचा, वेदनेचा हुंकार मुखर करण्याचे कार्य केले आहे.

### संदर्भग्रंथ


१. गवस राजन, 'कळप', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, १९९७, प्रथम आवृत्ती.
२. गवस राजन, 'तणकट', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००२, द्वितीय आवृत्ती.
३. गवस राजन, 'ब-बळीचा', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०१२, प्रथम आवृत्ती.
४. टापरे पंडित, 'कादंबरीसंवाद', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००५, प्रथम आवृत्ती.
५. पाटील संभाजी, 'राजन गवस यांचे साहित्य आशय आणि आकलन', सूर्यमुद्रा प्रकाशन, नांदेड, २०१८, प्रथम आवृत्ती.